मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक २७ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● सप्टेंबर १९९६

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## कुलबांधवांचे कर्तव्य

हितगुज जून १९९६ च्या अंकात हितगुज निधीसाठी देणगीचे आवाहन केलेले आहे. याला प्रतिसाद देणे मराठे कुलबांधवांचे कर्तव्य आहे.

त्यानुसार मी माझे वडील कै. शंकर चिंतामण (पृ. ४६०) यांच्या पुण्यस्मरणानिमित्त रु. ५०० पाठवीत आहे. कृपया स्वीकार व्हावा.

- **दत्तात्रय शंकर** (पृ. ४६०), नागपूर

***(याशिवाय खालील कुलबांधवांनीही हितगुज संवर्धन निधीसाठी भरघोस देणग्या दिल्या आहेत.***

१. श्री. गणेश विनायक (पृ.११५) मुंबई मानसकन्या प्राजक्ताच्या विवाहानिमित्त रु. १०००

२. डॉ. सुरेंद्रनाथ गणेश (पृ.२८४) घाटकोपर, मुंबई, माजी कार्यकारी मंडळ सदस्य, मुलीच्या विवाहानिमित्त रु. ५००

३. श्री. गजानन भास्कर (पृ.४२७) घाटकोपर, मुंबई, त्यांच्या एकपात्री 'बेस्टावलोकन' या कार्यक्रमाच्या मानधनातून रु. ५०१

***यांच्या उदाहरणाने इतरही कुलबांधवांना आपले कर्तव्य पार पाडण्याची स्फूर्ती मिळेल अशी आशा करतो. - संपादक)***

## कल करे सो आज कर ....

- येत्या दोन-तीन वर्षांत हितगुज हे ज्ञान-मनोरंजन-प्रबोधन-प्रशिक्षण करणारे सर्वांगपरिपूर्ण मासिक व्हावे असे संकल्पचित्र आहे.

- हे स्वप्नरंजन नाही. सर्वांच्या सहकार्याने ते सहज शक्य आहे. त्यासाठी प्रत्येकाने -

१. एक नवीन सभासद-वर्गणीदार नोंदवायचा.

२. माहेरवाशिणींना (मुली/बहिणी) फक्त रु. २०० देऊन (एकदाच) हितगुजचे तहहयात वर्गणीदार करायचे.

३. अपत्यप्राप्ती, वाढदिवस, विवाह, पुण्यस्मरण अशा निमित्ताने हितगुजसाठी रु. ५०० देणगी द्यायची.

४. स्वतःचा उद्योगव्यवसाय करणाऱ्यांनी दरवर्षी हितगुजमध्ये रु. ३ ते ५ हजारांच्या जाहिराती द्यायच्या.

- यांत आपला वाटा आपण उचलला? कधी उचलणार?

**कल करे सो आज कर, आज कर सो अब!**

## खास अभिनंदन

शिरसई, गोवा येथील प्रतिष्ठानचे सभासद **मोरेश्वर हरी (पृ.५४२) यांचा मुलगा आशिष** याने गोवा बोर्डाच्या बारावीच्या (वाणिज्य) परीक्षेत ७८% (अठ्याहत्तर टक्के) गुण व गुणवत्ता यादीत ११वा क्रमांक पटकावला. आशिष आणि त्यांच्या आई-वडिलांचे मराठे प्रतिष्ठानतर्फे खास अभिनंदन.

***दहावी, बारावी व महाविद्यालयीन परीक्षातल्या सर्व सफल विद्यार्थ्यांचे अभिनंदन! त्यांनी आपली नावे, गुण, टक्केवारी आणि पुढे कोणते शिक्षण चालू केले ही माहिती पुढील अंकात प्रसिद्धीसाठी पाठवावी.***

**मराठे प्रतिष्ठान**

**पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)**

**मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.**

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ**

महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी ८ जून, १३ जुलै आणि १० ऑगस्ट रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. या सभेच्या वेळा कोणीही कुलबांधव प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांना भेटण्यासाठी येऊ शकतात.

**शिक्षण निधी देणग्या**

गेल्या तिमाहीत शिक्षण निधीसाठी खालीलप्रमाणे देणग्या मिळाल्या :

१. गजानन चिंतामणी, पुणे (पृ. १२९)
(वडिलांच्या पुण्यतिथीनिमित्त) रु. १०१

२. अनंत रामचंद्र, दादर, मुंबई (पृ. ३९२)
(वडिलांच्या पुण्यतिथीनिमित्त) रु. १०१

३. वसंत बाळकृष्ण, सोलापूर (पृ. २७५)
(हुषार, होतकरू, गरजू विद्यार्थ्यांना सहाय्यासाठी) रु. ५००

**शैक्षणिक कर्ज**

पुण्यांतील कुलबांधव विनायक शंकर खांबेटे (पृ. ६७६) यांचा पुत्र किरण याला बी. ई. (इलेक्ट्रिकल) या अभ्यासक्रमासाठी स-शुल्क प्रवेश (पेड सीट) मिळाला आहे. त्याला प्रथम वर्षासाठी रु. १०,००० बिनव्याजी कर्ज द्यावे आणि पुढील वर्षाकरता परिस्थितीचा विचार करून निर्णय घ्यावा असे ठरविण्यात आले आहे.

**कर्ज फेड**

घाटकोपर मुंबई, येथील सभासद अनंत सदाशिव (पृ. ८७) यांना त्यांच्या कथासंग्रहाच्या प्रकाशनासाठी दिलेल्या रु. ५,००० कर्जाची त्यांनी अल्पावधीतच पूर्ण परतफेड केली आहे.

**हितगुज**

एक हजार वर्गणीदारांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने चाललेल्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. मागील तिमाहीत सुमारे २५ नवीन वर्गणीदार झाले.

काही सभासदांच्या आग्रहावरून माहेरवाशिणींना, त्या सभासद नसल्या तरीही, फक्त रु. २०० वर्गणी घेऊन हितगुजचे तहहयात वर्गणीदार करण्याचे ठरविण्यांत आले आहे. सर्व सभासदांनी आपापल्या मुलींना वर्गणीदार म्हणून नोंदवावे. येत्या भाऊबीजेला आपापल्या बहिणींना 'हितगुज' वर्गणीदार करून त्यांचा कुलबांधवांशी कायमचा अतूट संपर्क राहण्याची व्यवस्था करावी असे आवाहन आहे.

**सहाय्य योजना**

प्रतिष्ठानतर्फे शैक्षणिक मदतीसाठीची वडिलांच्या **उत्पन्नाची मर्यादा (दरमहा रु. १०००) रद्द करण्यात आली आहे.** होतकरू, गुणवंत, गरजू विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी मदत अथवा कर्जासाठी अर्ज करावे. तसेच वैद्यकीय खर्चासाठी आणि गरजू वृद्धांना सहाय्यासाठीही कुलबांधवांनी निःसंकोचपणे प्रतिष्ठानला लिहावे.

मागील अंकातील अध्यक्षांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून आतापर्यंत ४ कुलबांधवांनी हितगुज संवर्धन निधीसाठी देणगी म्हणून रु. २,५०१ पाठवले आहेत. सर्व कुलबांधव मोठ्या प्रमाणांत त्यांचे अनुकरण करण्यास पुढे येतील अशी आशा आहे.

**कुलवृत्तान्त**

मराठे कुलवृत्तान्तांतली (२री आवृत्ती) माहिती साधारणपणे १९८८-८९ पर्यंतची आहे. त्यापुढील माहिती, तसेच काही व्यक्तींची त्यांत समाविष्ट न झालेली व अपुरी माहिती या सर्वांचा समावेश करून एकेका घराण्याची अद्ययावत माहिती संकलित करण्याचे काम हाती घ्यावयाचे आहे. आपापल्या घराण्यापुरते हे काम करण्याची इच्छा असणाऱ्यांनी प्रतिष्ठानशी संपर्क साधावा.

---

**समस्यापूर्ती स्पर्धा**

मागील (जून १९९६) अंकातील समस्यापूर्ती स्पर्धेतील काव्यपंक्ती व अर्थ खालीलप्रमाणे -

सज्जनस्य हृदयं नवनीतम् ।
यद्वदन्ति कवयस्तदलीकम् ।
अन्यदेहविलसत्परितापात् ।
सज्जनो द्रवति नो नवनीतम् ॥

अर्थ - सज्जनाचे हृदय म्हणजे लोणी आहे. (लोण्याप्रमाणे मऊ आहे) असे कवी म्हणतात ते खोटे आहे. कारण दुसऱ्याच्या शरीरातील तापामुळे (दुसऱ्याच्या दुःखामुळे) सज्जन विरघळतो (त्याच्या मनाला दुःख होते), मात्र लोणी द्रवत नाही.

**पारितोषिक विजेत्यांची नावे**

१. प्रथम पारितोषिक रु. २५ - कु. वर्षा सुधीर (पृ.२०) कराड, जि. सातारा.
२. द्वितीय पारितोषिक रु. १५ - कु. जान्हवी मुकुंद फडणीस (पृ. २२८) बोरिवली (पू.), मुंबई
३. तृतीय पारितोषिक रु. १० - कु. अनुजा सदानंद (पृ. ४१७) वांद्रे (प.), मुंबई

**यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन!**



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

**स्वागत नवागतांचे**

पुण्यातील प्रतिष्ठानचे सदस्य गजानन चिंतामणि (पृ. १२९) यांचे बंधु गिरीश यांना २१-५-९६ रोजी मुलगी झाली. तिचे नाव ऋतुजा ठेवले आहे.

**मानसन्मान**

(१) प्रतिष्ठानचे **कॅनडातले सभासद डॉ. एकनाथ व्यंकटेश** (पृ. ३८९) यांना कॅनडाच्या फेडरल गव्हर्नमेंटने १९९६ चे 'कॅनेडियन हेल्दी एन्व्हायर्नमेंट अॅवॉर्ड' देऊन गौरविले आहे. पर्यावरण क्षेत्रातल्या त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना हे पारितोषिक देण्यांत आले आहे.

२) प्रतिष्ठानचे सदस्य, **जळगांव येथील उद्योजक अच्युत गोविंद खांबेटे** (पृ. ६९७) यांना व्यापारी एकता दिनाच्या निमित्ताने सांगलीच्या बिझिनेस एक्स्प्रेस या साप्ताहिकाने पुरस्कृत केलेला व्यापार सेवा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

३) प्रतिष्ठानचे सभासद **संगीततज्ञ डॉ. सुधाकर जनार्दन,** पुणे (पृ. ४५) हे अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या कार्यकारिणीवर सेक्रेटरी म्हणून तीन वर्षांसाठी निवडून आले आहेत. जानेवारी १९९६ मधे पुण्यांत झालेल्या प्रतिष्ठानच्या अखिल भारतीय संमेलनप्रसंगीची त्यांची शास्त्रीय व नाट्य संगीताची अप्रतिम मैफल अजून श्रोत्यांच्या स्मरणात असेल. या मैफलीची कॅसेट त्यावेळी अनुपस्थित कुलबांधवांसाठी आता मुंबईत उपलब्ध झाली असून इच्छुकांनी याबाबत प्रतिष्ठानचे कार्यवाहांशी (दूरध्वनी ४३० ३३२९) संपर्क साधावा.

४) **बडोदे येथील प्रतिष्ठानचे सभासद श्री. रघुवीर विष्णु यांचे बंधू मोहन** (पृ. ४२२) हे चुरशीच्या निवडणुकींत अन्योन्य सहाय्यकारी मंडळ को-ऑप. बँकेचे संचालक म्हणून प्रचंड बहुमताने निवडून आले. त्यांना समाजकार्याची आवड असून बडोद्यांतील मराठी वाङ्मय परिषद, ब्राम्हण सभा, अखिल गुजरात मराठी साहित्य संमेलन अशा विविध संस्थांशी ते संबंधित आहेत.

५) **भिवंडी जि. ठाणे येथील** ग्रंथालय कार्यकर्ते व ग्रंथपाल आपले **कुलबांधव गोविंद (शरद) गंगाधरराव** (पृ.२९८) यांना यंदाचे कृ.द. पुराणिक ग्रंथालय पुरस्कार नुकताच देण्यांत आला. राज्याचे पहिले ग्रंथालय संचालक श्री. पुराणिक यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ पुराणिक ट्रस्टतर्फे हा पुरस्कार प्रतिवर्षी दिला जातो. हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**अमेरिकेतल्या मराठ्यांचे नाट्यवेड**

धाकटा मुलगा मुकुंद (पृ. ७०) याने दिग्दर्शित केलेले प्र. ल. मयेकर लिखित अग्निपंख नाटकाचा काल (१५.६.९६) पहिला प्रयोग इथे झाला. त्याने रावसाहेब ही आणि त्याची पत्नी रेखा हिने बाईसाहेब या प्रमुख भूमिका केल्या होत्या. थोरली सून मीनाक्षी माधव (पृ. ६९) हिने कलाविभाग संभाळला. नाटकाचा प्रयोग अप्रतिम झाला. बे एरिया महाराष्ट्र मंडळातर्फे हा कार्यक्रम झाला. दुसरा प्रयोग लॉस एंजेलिस येथे होणार आहे. सर्व कलाकार हौशी आहेत. मन लावून, अपार कष्ट घेऊन भूमिका करतात.

स्थानिक मराठी मंडळी नाट्यप्रयोगांची उत्कंठेने वाट पहात असतात व मनापासून दाद देतात. पगारी नोकरांअभावी पडद्यामागील कामे व खटपटी सर्व त्यांनाच अंग मोडून कराव्या लागतात. मोठे मोठे पगारदार हमाल, सुतार, ड्रायव्हर, पडदेवाले, साउंडवाले, फोटोग्राफर होतात. अर्ध्या चड्डीत वावरतात. हसत खेळत.

- विनायक गोपाळ (पृ. ७०), सनीव्हेल, कॅलिफोर्निया

**सहस्त्रचंद्रदर्शन**

प्रतिष्ठानच्या **औरंगाबाद शाखेचे अध्यक्ष श्री. चिंतामण पांडुरंग विद्वांस** (पृ. ६४६) यांच्या चिरंजिवांनी २३ मे १९९६ रोजी औरंगाबाद येथे त्यांचा सहस्त्रचंद्रदर्शन हा सोहळा आयोजित केला होता. या समारंभाचे वैशिष्ठय असे की हा सोहळा श्री. सुधीर चिंतामण विद्वांस यांच्या तथास्तु या सुंदर नवीन वास्तु मधे संपन्न झाला व त्याच वेळी त्यांच्या मातोश्री सौ. मालती चिंतामण विद्वांस यांची पंचाहत्तरी झाल्यामुळे त्यांचा सत्कार ही झाला. विद्वांस काका व काकुंना येथील मराठी समाजामधे त्यांच्या समाज कार्याच्या व्रतामुळे खूपच मान आहे. या समारंभास त्यामुळे खूपच मंडळी उपस्थित होती.

**श्री. अच्युत भास्कर मराठे**

गिरगांव, मुंबईतील ब्राम्हण सभेच्या स्वयंसेवक शाखेच्या इतिहासांत ज्यांचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे अशी व्यक्ती म्हणजे श्री. अच्युत भास्कर (पृ.३२९) ही होय. त्यांचा मित्र परिवार त्यांना कौतुकाने 'अखिल भारतीय मराठे' असे म्हणतात. कारण त्यांची विरारपासून चर्चगेटपर्यंत तर कल्याणपासून कुलाब्यापर्यंत वर्गणी जमा करण्याकरिता सतत भ्रमंती चालू असे.

Marathe Pratishthan

त्यांचा जन्म २३ एप्रिल १९०७. ते मूळचे आगाशीचे. १९३५ मध्ये ते सभेचे स्वयंसेवक झाले. ब्राम्हणसभा हेच त्यांचे घरदार होय. अविवाहित राहून सर्व आयुष्य सभेच्या कार्यासाठी वेचले. १९८४ साली त्यांनी सभासदांचे घरोघर जाऊन एकट्याने सुमारे १२,०००/- वर्गणी जमा करण्याचा उच्चांक गाठला. सभेच्या सर्व स्वयंसेवकांपुढे एक आदर्श ठेवला. ब्राम्हणसभा व नर्सिंग होमकरिता देणगी रूपाने निधी जमविला तो वेगळाच. असा स्वयंसेवक, कार्यकर्ता क्वचितच मिळतो. त्यांच्या अमूल्य सेवेबद्दल १२/४/८१ रोजी त्यांचा साहित्यसंघ-भालेराव नाट्यगृहांत शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यांत आला. गेली तीन वर्षे ते कार्यरत नसले तरी सभेने त्यांनी केलेल्या कार्याची जाण ठेवून त्यांची नर्सिंग होम मध्ये सोय केली आहे. त्यांना उत्तम आयुरारोग्य लाभो हीच प्रार्थना.

**परीक्षांतले यश**

१) प्रतिष्ठानचे कार्यवाह **विनायक केशव (पृ. २०) यांची मुलगी हेमलता** एप्रिल १९९६ मधे झालेल्या बी. कॉम. परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली.

२) हितगुजचे संपादक **लक्ष्मण शंकर (पृ. ५२०) यांची मुलगी दीप्ती** ही मे १९९६ मधे झालेल्या एम. एस्सी. (लाईफ सायन्सेस) च्या प्रथम वर्षाच्या परीक्षेत ६५ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली.

३) प्रतिष्ठानच्या चुनाभट्टी मुंबई येथील सभासद **श्रीमती मालतीबाई दत्तात्रय (पृ.३५८) यांचा नातू अमित अशोक जोगळेकर** हा जून १९९६ मधे झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या बी. ई. इन्स्टुमेंटेशन परीक्षेत ७५ टक्के गुण मिळवून डिस्टिंक्शन श्रेणीत पास झाला.

**वरील सर्वांचे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन!**

**नांदा सौख्यभरे**

प्रतिष्ठानचे **दादर मुंबई येथील सदस्य व कार्योपाध्यक्ष गणेश विनायक (पृ. ११५) यांची मानसकन्या स्वागता** हिचा शुभविवाह प्रसाद मधुकर पंडित, विलेपार्ले, मुंबई यांच्याशी मुंबईत दि. १० ऑगस्ट १९९६ रोजी संपन्न झाला. स्वागता ही रशियन शिकण्यासाठी 'ग.वि.'कडे येऊ लागली. पुढे ती त्यांच्या घरी राहण्यास आली. त्यांची मानसकन्या बनून. बी. ए. ला ती दुसरी आली. एम. ए. ला पहिली व संस्कृतचे सुवर्णपदक. आपल्या तीन्ही मुलांप्रमाणेच तिलाहि 'ग.वि.'नी अमेरिकेत शिक्षणासाठी पाठवले. सध्या स्वागता अमेरिकेत पेनसिल्वेनिया विद्यापीठांत संस्कृत व्याकरणात पी. एच्. डी. करीत असून प्रसादने स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क मधून एम्. एस्. पूर्ण केले आहे आणि सध्या बफेलो येथे तो नोकरी करीत आहे.

स्वागताचे कन्यादान तिचे आणखी एक मानस माता-पिता सौ. गौरी आणि पराग वसंत माहुलीकर यांनी केले.

**सहवेदना**

१) माणगांव, जि. रायगड येथील प्रतिष्ठानचे सभासद **डॉ. सुनील यशवंत (पृ. २४८) यांची पत्नी स्नेहल** यांचे १८.४.१९९६ रोजी आकस्मिक निधन झाले.

२) औरंगाबाद येथील कुलबांधव **श्रीकांत माधव यांचे वडील माधव कृष्ण** (पृ. २३८) यांचे अल्पशा आजारानंतर वयाचे ९४व्या वर्षी औरंगाबाद येथे १७.५.१९९६ निधन झाले. वास्तुशास्त्रज्ञ म्हणून हैद्राबादला सरकारी नोकरीत असताना केवळ सामाजिक बांधलकी म्हणून अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांच्या इमारतींची कामे केली. 'कलामंडळ' या सांस्कृतिक मंडळाच्या स्थापनेत भाग घेऊन त्या मंडळातर्फे भरपूर आर्थिक मदत गरजू शैक्षणिक संस्थाना, नाटकांचे उत्तम प्रयोग करून मिळवून दिली. औरंगाबाद येथे आल्यावर सरस्वती भुवन या सामाजिक शिक्षण संस्थेच्या सर्व इमारती व परिसर योजनाबध्द रितीने कसलीही अपेक्षा न ठेवता, उत्तमप्रकारे बांधून पूर्ण केला. "मराठे जरी गेले तरी त्यांनी उभ्या केलेल्या इमारतींकडे पाहिले की त्यांची आठवण नेहमीच येईल. त्या दृष्टीने ते अमर आहेत" अशी ज्येष्ठ, सामाजिक कार्यकर्ते श्री. गोविंदभाई श्रॉफ यांनी त्यांना श्रध्दांजली वाहिली.

३) बडोदा येथील कुलबांधव **उल्हास बाळकृष्ण** यांचे **वडील बाळकृष्ण गणेश** (पृ. ३८७) यांचे जून १९९६ मध्ये निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते.

४) प्रतिष्ठानचे **कर्जत येथील** सदस्य श्री. चंद्रकांत नारायण यांचे वडील **श्री. नारायण विष्णु** (पृ. ३०७) यांचे अल्पशा आजाराने त्यांच्या रहात्या घरी १६.६.१९९६ रोजी निधन झाले.

५) कळवा, ठाणे येथील प्रतिष्ठानचे क्रियाशील सभासद **चिंतामणी त्र्यंबक (पृ. २४८) यांच्या मातोश्री इंदिराबाई** यांचे दि. १८.६.१९९६ रोजी वृध्दापकाळामुळे निधन झाले. बडोद्यातील त्यांचा मुलगा प्रभाकर याच्याकडे जायची त्यांची तीव्र इच्छा होती. त्यांच्याकडे गेल्या असता बडोद्यातच त्यांचे निधन झाले.

६) मुंबईतील महाराष्ट्र स्टेट को. ऑप. बँकेतील



Marathe Pratishthan

अधिकारी, प्रतिष्ठानचे सभासद **श्री. विश्वनाथ बळवंत (पृ. ३०) यांची पत्नी शोभा** यांचे अल्पशा आजारानंतर दि. १६ जुलै १९९६ रोजी हार्ट फेल होऊन दुःखद निधन झाले.

७) कल्याण, जि. ठाणे येथील **कुलबांधव श्री. प्रभाकर परशुराम** (पृ. १८) यांचे ५०व्या वर्षी, हृदयावरील बाय-पास शस्त्रक्रियेच्या वेळी दि. २६ जुलै १९९६ रोजी. दुःखद निधन झाले. प्रतिष्ठानच्या जानेवारी १९९६ मध्ये पुणे येथील अधिवेशनात सत्कारीत विशेष कर्तबगार कुलबांधव, सिडकोचे अध्यक्ष नारायण परशुराम यांचे ते धाकटे बंधु. ते असि. डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशन या पदावर होते.

(८) जुन्या पिढीतले प्रसिध्द लेखक, प्रतिष्ठानचे सन्माननीय सदस्य **कै. दत्तात्रय श्रीधर, मुंबई यांच्या सुविद्य पत्नी विमलाबाई ऊर्फ माई** (पृ. १८२) यांचे हृदय विकाराच्या झटक्याने २ ऑगस्ट १९९६ रोजी निधन झाले. त्या ८४ वर्षाच्या होत्या. मुले मोठी झाल्यावर शालेय व कॉलेज शिक्षण सुरू करून १९६२ साली त्या जर्मन विषय घेऊन बी. ए. झाल्यानंतर त्यांनी फ्रेंच शिकण्यास प्रारंभ केला. पश्चिम उपनगरातल्या शेकडो विद्यार्थ्यांना त्यांनी जर्मन व फ्रेंच भाषेचे धडे दिले होते.

(९) आय. आय. टी. पवई, मुंबई येथील सेंटर फॉर स्टडीज इन रिसोर्स एक्स्प्लोरेशन मधील **तरुण सायंटिफिक ऑफिसर डॉ. गिरीश त्र्यंबक** (पृ.२१८) यांचे ७.९.१९९६ रोजी ते त्यांच्या सहकाऱ्यांसह अभ्यास दौऱ्यावर गेले असतां मोटर अपघातांत दुःखद निधन झाले.

**वरील सर्वांच्या कुटुंबीयांच्या दुःखांत मराठे कुलबांधव सहभागी आहेत.**

---

बालक आणि पालक - ३

# नापास विद्यार्थी

सौ. नीलांबरी रमेश (पृ.२८०), मानसतज्ञ, पुणे (फोन ४५६२७०)

***पालक व समाजातील वक्तव्ये आणि वैयक्तिक निराशा यांमुळे नापास विद्यार्थी खचून जातात. अशा वेळी पालकांनी मुलांचा राग राग करण्यापेक्षा त्यांना समजून घेणे महत्वाचे आहे.***

१०वी, १२वीचा निकाल लागल्यावर ज्या मुलांना चांगले मार्क मिळालेले असतात त्यांच्यात मार्कांची चर्चा सुरू होते. चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळण्यासाठी पालकांची धावाधाव चाललेली असते. त्याच वेळी काही हिरमुसलेली मुले अंधारात आपला चेहरा लपवून उभी असतात. त्यांचे डोळे पाण्याने डबडबलेले असतात. कारण 'नापास' हा शिक्का त्यावेळेस तरी त्यांना माणसातून उठवतो. पालकांची रागीट नजर आणि हेटाळणीचे उद्‌गार सतत त्यांच्यावर भडिमार करत असतात.

अशा वेळेस नापास झालेल्या मुलांच्या मनाची अवस्था काय होते? काही जण ओक्साबोक्शी रडतात. तर काही जणांना आता जगण्यात काय अर्थ असे वाटून आत्महत्येचे विचार त्यांच्या मनात येतात. नापास झालो म्हणजे यापुढे आपण आयुष्यात कधीच यशस्वी होणार नाही असे वाटते. त्यामुळे नैराश्य येते. आत्मविश्वास नष्ट होतो. स्वतःबद्दल न्यूनगंड निर्माण होतो. स्वभाव चिडचिडा बनतो. उदास आणि एकटे रहावेसे वाटते. अशी मुले मानसिक दृष्ट्या दुबळी बनतात. त्यांचे मनोधैर्य खचून जाते.

नापास झाल्यामुळे मुलांच्या मनात सतत जे नकारात्मक विचार येतात ते कमी करण्यासाठी त्यांना दिलासा देऊन मुले होकारात्मक विचार करतील यादृष्टीने पालकांनी प्रयत्न करायला हवे. मग प्रश्न पडतो की प्रयत्न करायचे म्हणजे नेमके काय करायचे? तर विविध उदाहरणे देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवायचा. गुलाबाच्या फुलाला ज्याप्रमाणे काटे असतात त्याप्रमणे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात सुखाच्या जोडीला दुःखेही येतातच. गुलाबाचे काटे जेव्हा आपण अलगद बाजूला काढून टाकतो तेव्हाच गुलाबाच्या सुगंधाचा आणि सौंदर्याचा आस्वाद घेता येतो. त्याचप्रमाणे नापास झाल्याचे दुःख बाजूला सारून जिद्दीने पुन्हा यश मिळवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. ध्येय प्राप्त होईपर्यंत बाजीप्रभुसारखे खिंड लढवत राहिले पाहिजे.

अशी उदाहरणे दिली तर हळूहळू मुलांचा आत्मविश्वास वाढून न्यूनगंड कमी व्हायला मदत होते. पालकांनी मुलांच्या मानसिक दुःखावर मीठ चोळत बसण्यापेक्षा हळुवारपणे फुंकर घातली पाहिजे. अशा वेळेस पालकांनी मुलांना सांभाळून घेतले तर मुलांनाही हळूहळू पटतं की आपण आपल्या दुःखाला कुरवाळत न बसता, नशिबाला दोष न देता, अपयशाची कारणे

Marathe Pratishthan

शोधून, अपयशावर मात करून यश मिळवलं पाहिजे.

कितीतरी कारणांनी मुले नापास होण्याची शक्यता असते. ती आपल्याला टाळता येतील काय? त्यासाठी काय प्रयत्न केले पाहिजेत? मुलगा नापास होऊ नये यासाठी काय उपाययोजना करता येईल ते पाहू या.

१) परीक्षेत यश मिळवण्यासाठी अभ्यास आणि शारीरिक तंदुरुस्ती या दोन्ही गोष्टींकडे सारखंच लक्ष पुरवणं आवश्यक आहे. त्यासाठी तयारी खरं तर विद्यार्थी जीवनाच्या सुरवातीपासून करायला हवी. शरीर आणि मन निरोगी असेल तर डोक्यात विचारांचा गोंधळ न होता एकाग्रतेने अभ्यास करता येतो. म्हणून प्रारंभापासून रोज नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे.

२) मुलांनी रात्री जागून अभ्यास करण्यापेक्षा पहाटे उठून अभ्यास करावा. कारण रात्रीची ५,६ तास झोप सर्वांनाच अगदी आवश्यक आहे. रात्रीच्या झोपेचे फायदे दिवसा कितीही झोपले तरी मिळू शकत नाहीत. रात्रीच्या जागरणामुळे दिवसा मनाची एकाग्रता कमी होते. त्यामुळे रात्री जागून अभ्यास केल्याचं समाधान मिळालं तरी अभ्यासाच्या दृष्टीने त्याचा फायदा होत नाही. उलट मेंदूची कार्यक्षमता कमी होते.

३) घरातील वातावरण नेहमी शांत व अभ्यासाला पोषक असावे.

४) १०वीचे वर्ष तसे ६ महिन्यांचेच असते कारण जूनमध्ये शाळा सुरू होते व डिसेंबर अखेरपर्यंत अभ्यासक्रम संपवला जातो. त्यात मधेमधे सुट्ट्या असतातच. शाळेतील कार्यक्रमही असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी ९वीचा निकाल लागल्यावर चक्क अभ्यासाला लागावं.

५) बाहेर ज्या विषयांचे क्लास लावायचे आहेत. ते एप्रिल, मे या दोन महिन्यात लावावे म्हणजे वर्षभर क्लासला जाण्यात वेळ व एनर्जी वाया जाणार नाही. उलट तो वेळ चिंतन, मनन व लेखन करण्यासाठी वापरता येईल.

६) प्रत्येक विद्यार्थ्याने वर्षाच्या सुरवातीलाच अभ्यासाचे वेळापत्रक तयार करावे व त्यानुसार कार्यवाही करावी.

७) सर्व मुलांनी आहार योग्य, समतोल व ठरलेल्या वेळी घ्यावा. त्यात फारसा बदल करू नये.

८) लेखनाची गती वाढवण्यासाठी प्रारंभापासून सराव करणे आवश्यक आहे.

९) अभ्यासाच्या चांगल्या सवयी अंगीकारून कमी वेळात जास्त व चांगला अभ्यास करण्यासाठी प्रयत्नशील असावे.

१०) मुलांच्या बौद्धिक क्षमतेनुसार पालकांनी यांच्याकडून यशाच्या अपेक्षा कराव्या.

११) १०वी, १२वी नंतर शाखा निवडीसाठी मुलांना सक्ती न करता त्यांना स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास पालकांनी प्रवृत्त करावे. अर्थातच मुलांची बुद्धिमत्ता, क्षमता व आवडनिवड पाहून त्यानुसार अभ्यासक्रमाची निवड करावी.

१२) नापास झालेली बरीच मुले इंग्रजी, गणित यासारख्या एखाद्याच विषयात नापास झालेली असतात. त्यामुळे हे विषय सक्तीचे न करता या विषयांना पूरक विषय निवडण्याची संधी उपलब्ध असावी.

१३) केवळ एका विषयात नापास झाल्यामुळे मुलाला 'नापास' हा शिक्का देण्यापेक्षा तो उत्तीर्ण असेल त्या सर्व विषयांचे प्रमाणपत्र दिले तर नापास विद्यार्थ्यांच्या कितीतरी समस्या कमी होण्यास मदत होऊ शकेल.

१४) शालेय वर्षात मुलगा नापास झाला तर वरच्या वर्गात चढवण्यासाठी पालकांनी आग्रही असू नये.

१५) जी मुले वारंवार नापास होत असतील त्यांचे बुद्धीमापन करून घ्यावे व बौद्धिक क्षमतेनुसारच त्यांना शिक्षण द्यावे.

१६) मुलांनी वर्षभर उनाडक्या करून केवळ परीक्षा जवळ आल्यावर रात्रीचा दिवस करून अहोरात्र अभ्यास करण्यापेक्षा रोज नियमितपणे ठराविक वेळ अभ्यास केला तर फायदा होऊ शकेल.

१७) मुलांनी दिवसभर नुसता अभ्यास करण्यापेक्षा (वाचन, लेखन, पाठांतर) केलेल्या अभ्यासातील किती लक्षांत आहे. हे पाहण्यासाठी चिंतन-मनन करणे आवश्यक आहे.

यासारख्या काही उपाययोजना केल्यास नापास होण्याचे प्रमाण कमी होऊ शकेल असे वाटते. समजा एखाद वेळेत सर्व प्रयत्न करूनही अपयश आले तर नुसते निराश न होता अपयश ही यशाची पहिली पायरी आहे असे समजून जिद्दीने प्रयत्न करावे. निखळ परिश्रमाशिवाय पुढे जाता येणार नाही हे ध्यानी धरावे. पाण्याच्या छोट्या धारेचे शेवटी नदीत व नंतर सागरात रूपांतर होते. पण हे अफाट रूप सहज प्राप्त होत नाही. तर तिलाही अनेक डोंगरदऱ्यातून काट्याकुट्यातून खाचखळग्यातून प्रवास करावाच लागतो हे लक्षात घेऊन त्यादृष्टीने प्रयत्न केल्यास नापास विद्यार्थ्यांना सुद्धा यश मिळू शकेल याची खात्री बाळगावी व निराश न होता प्रयत्न करत रहावे. केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे, हे जाणून प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते.

☆☆



Marathe Pratishthan

# सामाजिक बांधिलकीचे भान ठेवणारे सफल उद्योजक अच्युत गोविंद खांबेटे

***प्रतिष्ठानचे सभासद अच्युत गोविंद खांबेटे, जळगांव (पृ. ६९७) यांचा नुकताच व्यापार सेवा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या ग्रुप कंपन्यांचा 'उत्तम व्यवहार' करीत असतांनाच सामाजिक बांधिलकीचे भान सुटू न देणाऱ्या त्यांच्या कामगिरीचा हा त्रोटक परिचय.***

श्री. अच्युत खांबेटे हे जळगांवच्या औद्योगिक वसाहतीतील व्हिस्पी आणि कंपनी तसेच खांबेटे आणि खांबेटे कंपनीचे ज्येष्ठ भागीदार आहेत. व्हिस्पी आणि कंपनी हा मालकी हक्काची कंपनी १९३५ साली विकत घेतली. आता ती भागीदारी कंपनी आहे. हार्डवअर, पेंट, ऑईल एंजिन्सचे ते विक्रेते आहेत.

श्री. खांबेटे यांनी १९६६ साली मुलाच्या मदतीने वर्कशॉप सुरू केले. मजुरांना व नोकरांना नियमाप्रमाणे पगार देणे, त्यांना नियमाप्रमाणे बोनस देणे ही दोन्ही फर्मची वैशिष्ट्ये आहेत. खांबेटे यांच्या वर्कशॉपमध्ये २५ ते ३० मजूर काम करतात. इतर उद्योगाप्रमाणे त्यांच्या वर्कशॉपमध्ये टाळेबंदी संप कधीही झाला नाही. कामगार आणि मालक यांच्यात त्यांनी समन्वयाचे वातावरण निर्माण केले.

श्री. खांबेटे यांनी व्ही. आय. पी. ब्रेक्स, जैन ग्रुप, सुप्रिम इंडस्ट्रीज यांची कामे करण्याची ऑर्डर घेतली. त्यांनी सोलर वॉटर हिटरचेही काम सुरू केले आहे.

श्री. खांबेटे हे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अनेक वर्षे सभासद होते. जवळ, जवळ एक तप ते कार्यकारणीचे सभासद होते. स्व. नानासाहेब पुराणिक, रामकृष्ण बजाज, लालचंद हिराचंद, माधव आपटे हे अध्यक्ष असताना ते चेंबरचे सदस्य होते. लोखंड हार्डवेअर व्यापारी असोसिएशन जळगांवची स्थापना श्री. खांबेटे यांनी १९७३ साली केली. या असोसिएशनचे ते संस्थापक अध्यक्ष होते. जळगांव जिल्हा व्यापारी महामंडळही त्यांनी स्थापन केले. महामंडळाचे ते संस्थापक चिटणीस होते.

स्वतःचा उद्योग सांभाळत असतानाच श्री. खांबेटे यांनी व्यापारी बांधवाना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या समस्या व अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला. हे करीत असताना कुठलाही सभासद थकबाकीदार असू नये याची दखल त्यांनी घेतली. याशिवाय व्यापारी समाजाने कर चुकवेगिरी करू नये म्हणून त्यांची आग्रही भूमिका राहिली. परिस्थितीचा कुणी गैरफायदा घेऊ नये यासाठी त्यांचे प्रयत्न राहिले आहेत.

व्यापारी आणि उद्योजक यांनी आपल्या व्यवसायाबरोबरच सामाजिक बांधिलकीही ठेवावी असे श्री. खांबेटे यांना वाटते. त्यासाठी त्यांनी विविध वृत्तपत्रातून व साप्ताहिकातून लेखनही केले आहे. उद्योग व्यवसायात काळा पैसा येऊ नये, भ्रष्टाचारापासून हे क्षेत्र वेगळे रहावे, शासकीय व्यापार व उद्योग, जकात कर वसुलीतील त्रास अशा अनेक विषयावर त्यांनी अभ्यासपूर्ण लेखन केले आहे.

१९७० मध्ये जळगांवला मोठी जातीय दंगल झाली. ती थांबावी म्हणून पोलिसांच्या मदतीने श्री. खांबेटे यांनी स्वतः पुढाकार घेतला. त्यामुळे दंगल लवकर शमली व मोठी हानी टळली. रोटरी क्लबचे ४० वर्षे ते सभासद आहेत. त्यामुळे त्यांचा समाजातील विविध घटकांशी नेहमी संबंध येतो.

सिमेंटची टंचाई असताना अनेक व्यापाऱ्यांनी स्वतःचा आर्थिक लाभ करून घेतला, मात्र या काळात खांबेटे यांनी या परिस्थितीचा कुठलाही फायदा घेऊ नये असे व्यापाऱ्यांना सांगितले. या बिकट परिस्थितीत त्यांनी उत्तम प्रकारे कामगिरी केली, त्याबद्दल ए.सी.सी. कंपनीने त्यांचा बक्षिस देऊन गौरव केला आहे.

जकात कर रद्द करावा म्हणून सर्वत्र जे आंदोलन छेडले गेले त्यात श्री. खांबेटे यांनी मोठा पुढाकार घेतला. या आंदोलनात ते सक्रिय सहभागी झाले. जकातीसंबंधीची व्यापाऱ्यांची भूमिका काय आहे ती त्यांनी विविध वृत्तपत्रातून लेख लिहून व्यक्त केली. जकात करासंबंधी त्यांनी मांडलेल्या सूचना लक्षात घेण्यासारख्या आहेत.

श्री. खांबेटे यांनी व्यापार व उद्योग क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केली आहे. व्यापारी संघटनेबरोबरच सामाजिक बांधिलकीचे भान ठेऊन त्यांनी काम केले आहे. त्यांचे व्यापारी क्षेत्रातील उठावदार काम लक्षात घेऊन सांगलीच्या बिझिनेस एक्सप्रेस साप्ताहिकाने त्यांना पुरस्कार देऊन गौरवित केले आहे.

श्री. खांबेटे यांच्याकडून याहीपुढे असेच काम घडावे व त्याचा लाभ व्यापारी, उद्योजक व नागरिकांना व्हावा, तसेंच प्रकाश व आनंद या त्यांच्या कर्तबगार पुत्रांनी त्यांचा हा वसा असाच पुढे चालवावा अशीच सर्वांची इच्छा आहे. ☆☆

Marathe Pratishthan

# संस्कृत भाषा हा भारतीय संस्कृतीचा मूलाधार

रमेश भिकाजी (पृ. ३६५), पुणे. (फोन : ३५३७०२)

संस्कृत भाषा हा भारतीय संस्कृतीचा कणा व मूलाधार असल्यामुळे यापुढे संस्कृत भाषेला महत्व आहे का असा प्रश्नच उद्भवू शकत नाही. या भाषेची सद्यस्थिती ही आपल्या समाजाच्या अतिशय स्वार्थी, संकुचित, आप्पलपोटेपणाच्या वागण्यामुळे झाली आहे. संस्कृतच्या यापुढील अभिवृद्धीसाठी एक मध्यवर्ती समर्थ संस्था (सेक्रेटरिएट) निर्माण करायला पाहिजे. या संस्थेचे कार्य खालील प्रकारे असावे.

१) विविध ठिकाणी चालू असलेले नानाविध अभ्यासक्रम, संस्कृतचे कार्य करणाऱ्या विविध संस्था, व्यक्ती, ग्रंथालये, संस्कृतच्या अभ्यासासाठी उपलब्ध असणाऱ्या सोयी, स्कॉलरशिप इत्यादींची माहिती संकलित करणे.

२) अभ्यासक्रम, मनुष्यबळ, संस्था, सुविधा आणि संशोधन यांमध्ये समन्वय साधणे.

३) संस्कृतच्या अभिवृद्धीसाठींच्या प्रयत्नांचे नियोजन, त्यासाठी व्यूहरचना (Strategy) ठरवणे आणि अंमलबजावणीवर सतत देखरेख ठेवणे (Monitoring)

४) या सर्व कामाच्या अंमलबजावणीचे व्यावसायिक व्यवस्थापन (Professionalism) करणे.

५) होणारे प्रयत्न, मिळणारे यश, यांचे नामांकित अशा निवृत्त लोकांच्या निःपक्षपाती समिती मार्फत सतत मूल्यमापन करून झालेल्या चुका व आढळलेल्या उणीवा दूर करणे.

६) प्रचार, प्रसार व प्रतिमा निर्माणावरच कामाचे यश बव्हंशी अवलंबून असते. यासाठी अगदी प्राथमिक शाळेपासून सुरवात करावी लागेल. शाळा-कॉलेजात व्याख्याने, स्पर्धा, हौशी मंडळे (क्लब) निर्माण करणे, वर्तमानपत्रांत वारंवार लिखाण प्रसिद्ध करणे, रेडिओ, टी. व्ही., यांसारख्या प्रभावी प्रसारमाध्यमांचा उपयोग करणे, प्रदर्शन भरवणे, म्युझियम निर्माण करणे, देशविदेशांत परस्पर संपर्क दौरे, आदान-प्रदान व्यवस्था करणे.

---

## संस्कृत आतां कालबाह्य

सौ. सुनिती जयंत (पृ. १८०), माटुंगा, मुंबई.
(फोन : ४१४१८७६)

संस्कृत भाषा आता कालबाह्य झाली आहे हे आपण मान्यच करायला हवे. आपल्या पोथ्यापुराणात सगळे आधुनिक विज्ञान आहे. त्यासाठी संस्कृतचा अभ्यास होणे गरजेचे आहे असे म्हटले जाते. पण हा अभ्यास काही प्रत्येकाने करण्याची गरज नसते. ज्या पाश्चिमात्यांचे आपण अनुकरण करतो, त्यांच्याकडे सुद्धां सर्वसामान्य लोक ग्रीक-लॅटीन या भाषा शिकत नाहीत. फक्त भाषेच्या अभ्यासाची किंवा संशोधनाची आवड असलेले लोकच या जुन्या भाषा शिकतात.

## संस्कृतचे महत्व नगण्य

अनंत धोंडो खांबेटे (पृ. ६९८), शीव, मुंबई.
(फोन:४०२३२२०)

अलिकडच्या भूतकाळांत पाश्चिमात्यांचे वैज्ञानिक संशोधन व जेट युगाने जग फार जवळ येत चालले आहे. अशा परिस्थितीत संस्कृतला महत्व देणे म्हणजे घड्याळाचे काटे उलट फिरवणे होय. तळागाळांतला व बहुजन समाज यांना संस्कृत भाषेचे ना सोएर ना सुतक संस्कृतची मागणी उच्चवर्णीयांकडून होते.

प्राप्त परिस्थितीत संस्कृतचे महत्व नगण्य. संस्कृतचेच नव्हे तर कोणत्याही विषयाचे महत्व स्थळकाळपरत्वे आणि व्यक्ती परत्वे ठरविले जावे.

***(संस्कृत भाषेचे २१ व्या शतकांतील महत्व या विषयावर स्पर्धा जाहीर केली होती. या स्पर्धेसाठी आलेल्या तीन लेखांतील महत्वाचा भाग येथे दिला आहे. या विषयावर व्यापक चर्चा व्हावी म्हणून वाचकांनी आपले विचार जरूर पाठवावे असे आवाहन आहे. विशेषत: रमेश भिकाजी यांनी सुचविलेले अवाढव्य कार्य प्रतिष्ठानने हाती घ्यावे काय याबाबतची मते कुलबांधवांनी जरूर कळवावी.-संपादक)***

---

**खुषीपत्र**

जून १९९६ अंकांत माझ्या वडिलांच्या आठवणीच्या लेखाला आपण योग्य वेळी प्रसिद्धी दिल्याबद्दल आम्ही कुटुंबीय ऋणी आहो.

- गजानन चिंतामणी (पृ. १२९), पुणे

**प्रतिसाद**

हितगुजचा २६वा अंक वाचला. उत्कृष्ट आहे. त्यानुसार आमच्या घराण्याची माहिती (घराणे ५२वे, वेंगुर्ले) अद्ययावत करून महिनाभरात पाठवणार आहे.
-सदानंद विष्णु(पृ.४१७),बांद्रा,मुंबई (फोन ६४०५७२९)



Marathe Pratishthan

# अविस्मरणीय 'अमरनाथ' यात्रा!

दत्तात्रय त्रिंबक (पृ.९२), भाईंदर (प.) (जि. ठाणे) (फोन ८१९६१८८)

भाईंदर (जि. ठाणे) येथून आम्ही १० जण दि. १२ ऑगस्ट १९९६च्या सकाळी जम्मूतावी एक्सप्रेसने या यात्रेसाठी रवाना झालो. दुसऱ्या दिवशी रात्री आठ वाजता जम्मू मुक्कामी पोचलो. दुसऱ्या दिवशी वैष्णवदेवीचे दर्शन घेण्यासाठी गेलो. तेथून पायीं जाऊन पायीं आल्याने सर्वांचेच पाय दुखत होते. पण दि. १७ ऑगस्ट १९९६ ला पुढील प्रवासाला निघायचे असल्याने थोडीफार विश्रांती घेता आली.

१७ ऑगस्ट ९६ च्या पहाटे जम्मूहून निघून संध्याकाळी पहेलगाम येथे पोहोचलो. तेथे पोचताच पर्यटन कार्यालयात १० घोड्यांसाठी रु. २०,०००/- भरले. पैसे एका ठिकाणी भरायचे आणि घोड्यांचे वाटप दुसऱ्या खिडकीवर करायचे अशी (गैर) व्यवस्था होती. नोंदणी खिडकीसमोर असलेल्या रांगेत ३ तास उभे होतो पण खिडकीवर कोणीही व्यक्ती नोंदणीचे काम करण्यास हजर झाली नाही. अखेर कंटाळून तेथील अधिकाऱ्यांबरोबर भांडून रात्रौ १० वाजता सर्व पैसे (रु. २०,०००/-) परत मिळवले आणि भाड्याने घेतलेल्या तंबूमध्ये मुक्कामाला परतलो. पर्यटन खात्याकडून सांगण्यात आलेले 'विनाशुल्क' तंबू कोठेच आढळले नाहीत. सरकारी गैरकारभाराची ही चुणूक (प्रथम ग्रासे मक्षिकापात) पहिल्याच दिवशी अनुभवास आली. पुढील अमरनाथपर्यंतचा प्रवास पायीच करणे अपरिहार्य होते. ते आपणास झेपणार नाही या विचाराने आमच्यातील दोघांनी पुढे येणे रद्द केले व दुसऱ्या दिवशी जम्मूची वाट धरली.

१८ ऑगस्टच्या सुंदर, स्वच्छ वातावरणात सकाळी ७ वाजता आम्ही उरलेले सर्वजण पहेलगामहून चंदनवाडीकडे निघालो. वाहन कोणतेही उपलब्ध न झाल्याने चंदनवाडीपर्यंतचा १६ कि. मी. प्रवास पायीच केला व रात्रीचा मुक्काम तेथे केला. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा या यात्रेला खूपच गर्दी झाली होती. वाहतुक साधनांची कमतरता व नियोजनातील त्रुटी जमलेल्या यात्रेकरूंचे क्लेश वाढवीत होत्या. पहेलगामलाच वाहन मिळाले असते तर आमचा प्रवासाचा एक दिवस वाचला असता आणि पुढच्या प्रवासाची 'बात कुछ और बनती' पण ते होणे नव्हते. म्हणतात ना 'Man proposes and God disposes' चंदनवाडीहून शेषनागला आम्ही दि. १९ ऑगस्टला पोहोचलो. वाटेत 'पिसू' घाटीचा चढ कष्टमय आणि सर्वांचीच दमछाक करणारा होता. पिसूघाटी चढत असतानाच इतर यात्रेकरूंपैकी दोघांचा मृत्यू झाला. इथवरच्या आणि पुढच्या प्रवासात आमच्याबरोबर असलेले ३ अनुभवी हमाल आम्हाला मार्गदर्शन करीत होते व धीरही देत होते. इथल्या पहाडातला त्यांचा अनुभव व जन्मजात मिळालेला (शारीरिक) काटकपणा हेच त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन होते, शिदोरी होती. वैष्णवदेवीहून आम्ही बरोबर आणलेला एक हमाल तर आम्हा सर्वांचे रात्री पाय चेपायचा. त्याच्या या सेवेची दाद आम्ही फक्त अर्थरूपाने देऊ शकलो. चढावाच्या अरुंद रस्त्यावर, चालण्याच्या कमी अधिक वेगाने आमच्यात ताटातूट होत होती पण आम्हा सर्वांना एकत्र आणण्याचे काम आमचे हमाल सतत करीत होते. प्रचंड गर्दीत आमच्याच ओळखीतील एका जोडप्याची जी ताटातूट झाली ती त्यांची पुनर्भेट होण्यास चौथा दिवस उजाडला. या पार्श्वभूमीवर आम्हाला एकत्र आणण्याचे काम करणाऱ्या आमच्या हमालांचे प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद व अपूर्व होते यात शंका नाही.

त्या रात्री 'शेषनाग'ला मुक्काम करून २० ऑगस्ट १९९६ ला पंचतारणीस पोहोचलो व तेथून आमचे जे मुख्य इप्सित होते त्या अमरनाथाच्या गुहेकडे जाण्यास दि. २१ ऑगस्ट ९६ ला सकाळी सुरवात केली. गुहेकडे जाणाऱ्या मार्गावर सर्वत्र बर्फ पसरले होते. हवेतला असह्य असा गारवा जाणवत होता. चहापाणी घेऊन दुपारी १ च्या सुमारास दर्शनार्थींच्या रांगेत उभे राहिलो. मुंगीच्या गतीने रांग पुढे सरकत होती. प्रदीर्घ रांग व हवेतील थंडावा सहन करीत उभे रहाणे कित्येकांना असह्य झाल्याने त्यांनी तिथूनच माघार

## संवाद

वास्तुशास्त्राबद्दलचा माझा लेख (हितगुज मार्च १९९६) एडिट करताना भोंदुगिरी करणाऱ्या सो कॉल्ड वास्तुशास्त्र्यांबद्दल भयगंड पसरवून स्वार्थ साधण्याच्या त्यांच्या किमयेबद्दल आक्षेप घेणारा मजकूर आपण अजिबात येऊ दिला नाहीत. आपल्याला दृष्टिकोन आवडला नाही हे याचे कारण आहे काय?

**- श्रीकान्त माधव (पृ. २३८), औरंगाबाद**

***(आपली शंका बरोबर नाही. संक्षेप करताना आपल्या आक्षेप दर्शवणाऱ्या मजकुरापेक्षा घर बांधणाऱ्यांना व्यावहारिकदृष्ट्या उपयुक्त ठरणारी शास्त्रीय माहिती वाचकांपर्यंत पोचवणे अधिक महत्वाचे वाटले. - संपादक)***

Marathe Pratishthan

घेऊन परतीच्या प्रवासाला सुरवात केली. मुंबई, पुणे नगर येथील मंडळी मात्र अशाही परिस्थितीला नेटाने तोंड देत होती. संध्याकाळी आणखीच जोरदार बर्फवृष्टीला सुरवात झाली आणि जाणकारांनी आगामी संकटाची चाहूल ओळखली.

२२ ऑगस्ट ९६ रोजी पहाटे २ वाजता तब्बल ११ तास रांगेत उभे राहून आम्हाला शिवलिंगाचे दर्शन साध्य झाले. बर्फाने तयार झालेली ४ ते ५ फूट उंचीची ती मूर्ती आकर्षक दिसत होती. वाकून नमस्कार करीत असतानाच आता 'लवकरात लवकर पळा' अशी हाकाटी तिथला चहावाला करीत होता म्हणून ताबडतोब आम्ही माघारी फिरलो. जवळ असलेल्या ३, ४ विजेरीच्या अपुऱ्या प्रकाशात त्या बर्फाळ डोंगरातून अवघड अशी ती वाटचाल करीत पंचतारणीचा रस्ता मोठ्या जिद्दीने व जोखमीने आम्ही काटू लागलो. सकाळी ६ च्या सुमारास जोरदार पावसास सुरवात झाली व नंतर २, ३ तासांनी बर्फवृष्टी सुरू झाली.

सकाळी १० च्या सुमारास आम्ही पंचतारणीस आलो. तंबूवर बर्फ पडल्याने सर्वच तंबू सारखे दिसत होते. सर्व प्रदेश बर्फमय झाला होता. खच्चून बर्फ साठल्याने काही तंबू कोसळण्याचीही शक्यता होती. रांगेत खूप तास उभे राहून व लगेच जीवघेण्या पाऊस व बर्फवृष्टीतील प्रवासाने सर्वजण अगदी थकून गेलो होतो. विश्रांतीची नितांत आवश्यकता होती म्हणून तो उरलेला दिवस व ती रात्र तंबूत राहून काढली.

२३ ऑगस्टच्या पहाटे वातावरण आणखीनच बिघडलेले वाटल्याने बरोबरीच्या जाणकार, अनुभवी हमालांनी 'आता इथे राहणे धोक्याचे आहे' असा इशारा दिला. त्यामुळे झोपेची अत्यंत आवश्यकता असतानाही सकाळी आठ वाजता आम्ही पंचतारणीचा मुक्काम हलवून चंदनवाडीकडे निघालो. वाटेत काही मृतदेह, मृतघोडे व डोली टाकून पळालेल्या हमालांमुळे असहाय्य झालेली वृद्ध माणसे दिसली. अनेक प्रकारांनी मदत करण्यात लष्करातील जवान झटत होते पण निसर्गाचा झालेला हा भयंकर प्रकोप अभूतपूर्व असाच होता. शेषनाग व पुढे पहेलगामला चालत येत असता आमच्या जवळचा व वाटेवर असणाऱ्या 'लंगर' मधील अन्नपुरवठा संपुष्टात आला होता. सरकारी अन्नाची पाकिटे आम्हाला तरी कुठे मिळाली नाहीत. आधी वर जाताना मिळालेल्या काही वस्तूंचे भाव आता तिप्पट झाले होते.

शेषनागपासूनचा पुढचा प्रवास हा बऱ्या वातावरणात झाला. 'काळ आला होता पण वेळ आली नव्हती' असे मनात येऊन मृत्यूच्या संकटातून वाचल्याची स्पष्ट जाणीव आता झाली होती म्हणूनच की काय उपाशी असूनही दुर्दम्य मानसिक बलाच्या (will power) सहाय्याने २४ ऑगस्ट ९६ रोजी पहेलगामला सुखरूप आलो. तिथे तर माणसांचा नुसता समुद्र दिसत होता. अकस्मात आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे लोकांना अमरनाथकडे न जाऊ देता तिथेच थांबवले होते तर दुसरीकडे जम्मूला जाणारा हमरस्ता अनंतनाग येथे पुरामुळे व उधमपूर जवळ लँड स्लायडिंग मुळे बंद झाला होता. या अफाट जनसमुदायाची अन्न व निवास व्यवस्था पार कोलमडून पडली होती. आपापल्या घरी आपण सुखरूप आहोत असा दूरध्वनी करण्यासाठी साठी आम्हाला ७ तास रांगेत उभे रहावे लागले तर निवासाला जागाच नसल्यामुळे पर्यटन कार्यालयाच्या जिन्याच्या पायऱ्यांवर बसून व एक रात्र एका बसवाल्याला रात्रीपुरते बसमध्ये बसायला दे असे विनवून दामदुप्पट पैसे देऊन काढली.

पहेलगामहून गटागटांनी यात्रेकरूंना जम्मूकडे पाठविण्यात येत होते. आम्ही सर्वजण अखेर दि. २८ ऑगस्टला रात्री १० वाजता जम्मूला आलो. पहेलगाम सोडताना तर आमच्या हमालाच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. त्यांच्याच साथीने, सोबतीने व मार्गदर्शनाने आमचा आधीच्या आठवड्यातील खडतर प्रवास यशस्वी झाला होता. एकत्र येऊन केलेला तो प्रवास शरीरांनी वेगळा होता तरी मनानी मात्र अत्यंत जवळीकेचा होता.

परत मुंबईला येताना आम्ही कांहीजण विमानाने तर कांहीजण रेल्वेने असे दि. ३० व दि. ३१ ऑगस्टला सुखरूप भाईंदरला आलो. ही सारी त्या 'अमरनाथाची' कृपा !

☆☆

---

# षड्रिपु - शत्रू ? नव्हे मित्र !

श्रीधर परशुराम (पृ. ९८) पुणे.

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यांना आपल्या तत्वज्ञानांत षड्रिपु मानतात. आपण या जगांत शरीरधारणेने वास्तव्य करीत आहोत तेथपर्यंत आपण त्यांना मित्रच मानणे उपयुक्त ठरेल. या तथाकथित शत्रूंशिवाय मानव म्हणजे शेणगोळा किंवा मातीचे ढेकूळ याहून अन्य कोणी नाही असेच म्हणावे लागेल!

मी माऊंट अबू येथे पोलिस ट्रेनिंग करीत असतांना हॉर्स रायडिंग मास्तर आम्हाला सांगत असत - "साहब, रायडिंग बिल्कुल आसान है । घोडे पे सवार होना और घोडे को चलाना, लेकिन आप घोडे के काबू में नही जाना । घोडे को अपने काबू में रखना ।" त्या घोडयाप्रमाणे तथाकथित षड्रिपु हे आपले शत्रू नसून मित्रच आहेत, हे सांगणे नलगे !

Marathe Pratishthan

## ब्यूटी पार्लरचा व्यवसाय

सौ. सुनिता राजन (पृ.५१३), पुणे. फोन ६२१००४.

पार्लरची सुरवात करण्यापूर्वी आपल्याकडे ज्या व्यवसायाचे उत्तम, परिपूर्ण व शास्त्रशुध्द असे ज्ञान असणे आवश्यक आहे. या विषयीचा अभ्यास अगदी सोपा, हलकाफुलका, सहज जाता जाता कोणालाही करता येण्यासारखा आहे असा गैरसमज कृपया करून घेऊ नये. कारण या व्यवसायाचा संबंध मनुष्याच्या त्वचा, केस वगैरेशी आहे. यावर ज्या प्रक्रिया केल्या जातात त्या म्हणजे निव्वळ वरवरची रंगरंगोटी नव्हे. वेगवेगळी केमिकल्स, विद्युत उपकरणे इ. च्या सहाय्याने ते केले जाते. त्यामुळे शरीररचना, केमिस्ट्री, इलेक्ट्रीसिटी वगैरे ज्ञान आवश्यक आहे. नर्सेसना शिकवले जाणारे बरेचसे विषय या व्यवसायासाठी शिकणे आवश्यक आहे व नर्सेससारखी सेवाभावी वृत्ती असणे हे तर फारच आवश्यक आहे.

घरातील लोकांची संमती व सहकार्य, संपूर्ण शास्त्रशुध्द शिक्षण, स्वतःचे आरोग्य आणि कलासक्त मन - वृत्ती व संयम या गोष्टी असतील तर ब्यूटी पार्लर या व्यवसायातही आपण बरेच काही करू शकतो.

***(पुण्यांतील या व्यवसायांतली तज्ञ, मराठ्यांची माहेरवाशीण सौ. सुनिता राजन, यांचेकडून याबाबतींत अधिक मार्गदर्शन मिळू शकेल. - संपादक)***

---

## एकमेकां साह्य करूं

कु. सीमा लक्ष्मण (पृ.५४३) ही कॉम्प्युटर अभियांत्रिकी परीक्षा डिस्टिंक्शन मिळवून पास झाली आहे. ती सध्या गोव्यात ॲपटेक कॉम्प्युटर सेंटर मध्ये शिकवत आहे. तिला पुण्यासारख्या ठिकाणी नोकरी करायची इच्छा आहे. याबाबत कुठे शक्यता असल्यास कुल बांधवांनी कृपया प्रतिष्ठानला लिहावे.

## ग. भां. चे 'बेस्टावलोकन'

गजानन भास्कर (पृ.४२७) मुंबईतल्या 'बेस्ट'मधून सेक्रेटरी पदावरून निवृत्त झाले. नोकरीच्या काळांत त्यांनी टिपलेले अनेक मिस्किल, रोचक, रंजक किस्से त्यांच्या पोतडीत आहेत. त्यांचा 'बेस्टावलोकन' हा तास-दीडतासाचा एकपात्री कार्यक्रम म्हणूनच लहानथोर सर्वांना अतिशय आवडतो. कुलबांधवांनी आपापल्या कॉलनीत वा संस्थेत त्यांचा हा कार्यक्रम जरूर ठेवावा. त्यांचा पत्ता : सी-४-२, कॅशुरीना सोसायटी, घाटकोपर डेपोजवळ, घाटकोपर (पूर्व), मुंबई - ७५. फोन नं. ५१६ ३९०७.

**हसरे हितगुज**

- गेले पाच-सहा दिवस मी पहातोय, तुम्ही रोज तासभर उशीरा ऑफिसला येताय.

- पण साहेब त्याची भरपाई करण्यासाठी मी तासभर लवकर घरी जातो.

### खुषीपत्रे

१) 'मार्च १९९६ पुणे अधिवेशन विशेषांक खूप आवडला. हितगुज दिवसेंदिवस बाळसे धरीत आहे. प्रत्येक अंक वाचनीय असतो. त्यामुळे पुढील अंकाची आतुरतेने वाट पहात असतो. संपादक श्री. लक्ष्मणराव यांच्या नियोजनाचे कौतुक वाटते. थोड्याच काळांत हितगुज दर महिन्याला मिळत जाईल अशी आशा करतो.' **- वसंत बाळकृष्ण (पृ. २७५), सोलापूर**

२) 'हितगुजच्या मार्च १९९६ अंकातील स्वातंत्र्य देणाऱ्या घरांची गरज हा सौ. नीलांबरी मराठे यांचा लेख आणि सौ. मंगला काशिनाथ मराठे यांचा स्त्री पुरोहित हा लेख फारच भावला. इतरही लिखाण उत्तम वाटले. विचारप्रवर्तक वाटले. लेखांत एक प्रकारचा आशावाद दिसतो. तो नक्कीच हल्लीच्या युगांत स्वागतार्ह आहे.' **- श्रीकांत माधव (पृ. २३८), औरंगाबाद.**

३) 'परिपत्रक, समाचार पत्रिका, माहिती पत्रिका, असे टप्पे ओलांडत हितगुज करता करता आपल्या या त्रैमासिकाने चक्क दर्जा दाखवायला सुरवात केली आहे. प्रत्येक अंक मागच्यापेक्षा सरस निघत आहे. भावना सुखाची आहे. पण वाचकांच्या अपेक्षा वाढल्या आणि हा चढता आलेख आपल्याला या ना त्या कारणाने राखणे शक्य झाले नाही तर? अशी एक दुष्ट शंका मनाला चाटून गेली. विशेषतः 'संपादक पाहजे' चा बडगा खराच असेल तर! मन चिंती ते वैरी न चिंती.' **विनायक गोपाळ (पृ. ६९), सनीव्हेल, कॅलिफोर्निया**

### कोकणात अधिवेशन हवे

'पुणे अधिवेशनाला हजर राहण्याचे ठरवूनही तो योग आला नाही. पण अंक वाचून (मार्च १९९६) प्रत्यक्ष हजर राहून कार्यक्रम पहात आहे असे वाटले.

पुढील अधिवेशन कोकणात होईल अशी अपेक्षा ठेवावी? आपणा सर्वांना कोकण म्हणजे माहेर वाटते.'

**- वसंत बाळकृष्ण (पृ. २७५), सोलापूर**

यापुढील अंक डिसेंबरमध्ये, दिवाळीनंतर. म्हणून आतांच मराठे प्रतिष्ठानतर्फे सर्व कुलबांधवांना

**दीपावली शुभकामना!**



Marathe Pratishthan

मराठे प्रतिष्ठानला शुभेच्छा!

# महाराष्ट्र इंडस्ट्रीज डिरेक्टरी

**महाराष्ट्रातील सर्व उद्योगांची उत्पादनवार व जिल्हावार माहिती.**

: संपर्क :
महाराष्ट्र इंडस्ट्रीज डिरेक्टरी
विधाता अपार्टमेंटस्, २रा माळा,
दत्त मंदिरा समोर, कॉलेज रोड,
चेंदणी, ठाणे - ४०० ६०१.
दू. क्र. ५३३ ६५१४/५४३ १४९२
फॅक्स - ५३६ ६६६५.

## या अंकात

१. कुलबांधवांचे कर्तव्य ........................ पृ.१
२. कल करे सो आज कर ........................ पृ.१
३. समस्यापूर्ती स्पर्धा ........................ पृ.२
४. अमेरिकेतल्या मराठ्यांचे नाट्यवेड .......... पृ.३
५. नापास विद्यार्थी
सौ. नीलांबरी रमेश ........................ पृ.५
६. सफल उद्योजक अच्युत गोविंद खांबेटे ...... पृ.७
७. संस्कृत भाषेचे २१व्या शतकातील महत्व
रमेश भिकाजी, सौ. सुनिती जयंत आणि अनंत धोंडो खांबेटे या स्पर्धकांचे विचार .............. पृ.८
८. अविस्मरणीय अमरनाथ यात्रा
दत्तात्रय त्रिंबक ........................ पृ.९
९. षड्रिपु-शत्रू? नव्हे मित्र!
श्रीधर परशुराम, पु ........................ पृ.१०
१०. ब्यूटीपार्लरचा व्यवसाय
सौ. सुनिता राजन ........................ पृ.११
याशिवाय प्रतिष्ठान वृत्त (पृ.२,३), सभासद वृत्त (पृ.३-५), प्रतिसाद (पृ.८), खुषीपत्रे (पृ.८,११), संवाद (पृ.९), हसरे हितगुज (पृ.११) ही नेहमीची सदरे.

बुक पोष्ट

प्रति

K-035 MR. MURLIDHAR VASUDEV MARATHE 2076 23
188, GANESHBAUG
BELGRAMI ROAD
KURLA-W BOMBAY 400070

मराठे प्रतिष्ठान
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)

Marathe Pratishthan